RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ६, अंक १०६]   सोमवार, नोव्हेंबर २, २०२० / कार्तिक ११, शके १९४२   [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २६३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक २ नोव्हेंबर २०२०.

अधिसूचना

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.

क्रमांक जमीन-२०१६/प्र.क्र.३०२/ज-१.— महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) च्या कलम-३२८, च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) चे खंड (चार), (दहा) आणि (त्रेसष्ठ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व त्याबाबत समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत. या नियमांचा मसूदा उक्त संहितेच्या कलम-३२९, च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

नियम

१. या नियमांना, "महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) (द्वितीय सुधारणा) नियम, २०२०" असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ११ च्या पोट-नियम (५) मध्ये शब्द आणि अंकात, "**रुपये ३५,०००/-**" या मजकुरा ऐवजी "**रुपये ८,००,०००/-**" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रमेश चव्हाण,
शासनाचे सहसचिव.

REVENUE AND FORESTS DEPARTMENT

First Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 2nd November 2020.

NOTIFICATION

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No. Jamin-2016/C.R.302/J-1 .---In exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (iv), (x) and (lxiii) of sub-section *(2)* of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966) and all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules, further to amend the Maharashtra Land Revenue (Disposal of Government lands) Rule 1971, the same having been published previously as required by sub-section (*1*) of Section 329 of the said code, namely :—

RULES

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Disposal of Government of Lands) (Second Amendment) Rules, 2020.

2. In rule 11 of the Maharashtra Land Revenue (Disposal of Government of Lands) Rules, 1971, in sub-rule *(5)* for the letters and figures "Rs.35000", the letters and figures "Rs.8,00,000" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMESH CHAVAN,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.